महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३०९ वा | दिनांक : ०८/१०/२०२५ | वार : बुधवार

# फसणवीस सरकारकडून शेतकऱ्यांची फसवणूक : विरोधकांची टीका

**मुंबई** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या मदत पॅकेजवर विरोधी पक्षांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, ही मदत तुटपुंजी असून, सरकारने शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळल्याची संतप्त टीका करत कर्जमाफीच्या आश्वासनालाही पद्धतशीर बगल दिल्याचा आरोप रोहित पवारांनी केला. तर हेक्टरी ५० हजार रुपयांची मागणी असताना, केवळ तुटपुंजी मदत जाहीर करून, फसणवीस सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना सरकारकडून मोठा दिलासा देण्यात आला आहे. ज्या शेतकऱ्यांची जमीन पाण्यात वाहून गेली आहे, त्यांना हेक्टरी ३.४७ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येणार आहे. राज्य सरकारने अतिवृष्टी ग्रस्त शेतकऱ्यांसाठी ३१ हजार ६२८ कोटी रुपयांच्या मदतीचे मोठे पॅकेज जाहीर केले आहे. या पॅकेजअंतर्गत शेतकऱ्यांना केवळ जमिनीच्या नुकसानी साठीच नव्हे, तर घरांचे व जनावरांचे नुकसान भरपाई म्हणूनही मदत मिळणार आहे. सरकारच्या मदतीवरून विरोधकांनी टीका केली आहे.

संपूर्ण कर्जमाफीच्या मागणीला या सरकारने पद्धतशीरपणे बगल दिलीच, पण अतिवृष्टीने पूर्णतः उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्याला हात देण्यासाठी हेक्टरी किमान ५० हजार रुपये मदत देण्याऐवजी NDRF च्या निकषानुसारच तुटपुंजी मदत जाहीर करुन तोंडाला अक्षरशः पाने पुसली. राणा भीमदेवी थाटात ३१ हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केल्याची घोषणा केली. पण त्याचा हिशोब केला, तर शेतकऱ्यांचा झालेला खर्चही वसूल होणार नाही. बागायतीसाठी शेतकऱ्यांचा हेक्टरी ७० हजारपेक्षाही अधिक खर्च झाला असताना हे सरकार केवळ हेक्टरी ३२ हजार ५०० रुपये मदत देणार आहे. हंगामी बागायतीसाठी २७ हजार ५०० रुपये, तर जिरायतीसाठी १८ हजार ५०० रुपये शेतकऱ्याच्या हाती टेकवले जाणार आहेत. अशी तुटपुंजी मदत जाहीर करुन या सरकारने आक्रोश करणाऱ्या शेतकऱ्याच्या जखमेवर एकप्रकारे मीठ चोळण्याचेच काम केले, अशी टीका रोहित पवार यांनी केली.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी तर, ही मदत म्हणजे शेतकऱ्यांना वाटाण्याच्या अक्षदा लावण्यासारखे असल्याचे म्हटले. राज्यातील सर्व शेतकऱ्यांना सरसकट मदत देणे अपेक्षित असताना, सरकारने त्यातही धरसोड केली, ही अत्यंत निंदणीय बाब आहे. हेक्टरी 50 हजारांची मागणी असताना दिलेली मदत अत्यल्प आहे. पंजाब आणि कर्नाटक सरकार अनुक्रमे 50 हजार आणि लाख रुपयांपर्यंत मदत देऊ शकतात, मग महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेताना सरकारच्या हाताला कंप का येतो? असा संतप्त सवाल सपकाळ यांनी उपस्थित केला.

मुळात सरकारला काही द्यायचेच नव्हते. केंद्राकडूनही कोणती मदत घेतलेली नाही. आज दिलेल्या मदतीच्या निमित्ताने शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. या पॅकेजसंदर्भात आम्ही सरकारचा धिक्कार, निषेध करतो. खरे तर दसऱ्याच्या आधीच मदत द्यायला पाहिजे होती, आता दिवाळीतही देणार नसल्याचे म्हणत आहेत. त्यानंतर निवडणुकीची आचारसंहिता असल्याचे कारण सांगतील. एकंदरीत हे मदत देणारच नाहीत, हे फसवणीस सरकार असून, शेतकऱ्यांना फसवले आहे, अशी टीका सपकाळ यांनी केली.

महायुती सरकार हे शेतकऱ्यांची थट्टा करत आहेत. मराठवाड्यात जानेवारी ते सप्टेंबर मध्ये ७८१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. अतिवृष्टीमध्ये गेल्या १५ दिवसात ७४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असताना आज फक्त सरकारने मदतीचे आकडे फुगवून सांगत ही तर सरकारने शेतकऱ्यांची थट्टा केल्याची टीका काँग्रेस विजय वडेट्टीवार यांनी केली.

राज्यात शेतकऱ्यांची जमीन खरवडून निघाली आहे. त्यांची जनावर वाहून गेली आहेत अशा वेळी शेतकऱ्यांना सरसकट ५० हजार रुपये हेक्टरी मदत करण्याची अपेक्षा होती. अस असताना NDRF निकषानुसार दिलेली मदत ही तुटपुंजी आहे. याने शेतकरी उभा राहणार नाही तर उद्धवस्त होईल अशी टीका वडेट्टीवार यांनी केली. पंजाबसारखे राज्य केंद्राची मदत न घेता प्रति हेक्टरी ५० हजार पर्यंत मदत देऊ शकते मग महाराष्ट्रासारख्या समृद्ध राज्यात शेतकऱ्यांना ठोस मदत का दिली जात नाही? सरकारने जाहीर केलेली मदत दिवाळीच्या आधी मिळणार आहे का? शेतकऱ्यांबरोबर शेतमजूर देखील अडचणीत आला आहे, त्यांना काय मदत मिळणार? असा प्रश्न वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

राज्यातील विधानसभा निवडणुकीआधी महायुतीने शेतकरी कर्जमाफीची घोषणा केली होती. आज शेतकऱ्यांना कर्जमाफीची अपेक्षा असताना त्याची घोषणा केली नाही. कर्जमाफी करणार करणार फक्त तारीख पे तारीख सरकार सांगत आहे. पण नेमकी शेतकरी कर्जमाफी कधी देणार हे सरकार सांगत नाही, अशी टीका विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

## ऐतिहासिक वारसा जपा! स्मारके, समाधीस्थळांचे संवर्धन करा : उपमुख्यमंत्री अजित पवार



**मुंबई** : साताऱ्यातील संगम माहुलीच्या शिवकालीन राजघाट परिसरातील महाराणी ताराराणी, महाराणी येसूबाई, पहिले शाहू महाराज यांच्या समाधी स्थळांचे जतन आणि संवर्धन, मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसराचे सुशोभीकरण, संगमेश्वर येथील छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक या स्थळांच्या परिसराचा पुनर्विकास करताना तेथील परिसर, समाधी स्थळ, प्राचीन वास्तूंचे मूळ ऐतिहासिक सौंदर्य जपावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात झालेल्या बैठकीत संगम माहुली, सातारा येथे महाराणी ताराराणी, महाराणी येसूबाई आणि पहिले शाहू महाराज यांच्या समाधी स्थळाचे संवर्धन, जिर्णोद्धार आणि जमीन विकसित करणे, साताऱ्यातील अजिंक्यतारा किल्ला सुशोभीकरण, मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर सुशोभीकरण, रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर येथील छत्रपती संभाजी महाराज स्मारक या स्थळांच्या परिसर विकासाबाबत आढावा घेण्यात आला.

या सर्व ऐतिहासिक स्थळांचा पुनर्विकास करताना पुढील शंभर वर्षे टिकेल अशी वास्तू उभारावी. त्या ठिकाणी पुरेसे वृक्षारोपण करावे, स्वच्छता राखावी, पर्यटन आणि व्यावसायिक दृष्टिकोनही ठेवावा, भविष्यातील देखभाल - दुरुस्ती बाबतही आतापासूनच उपाययोजना करावी, अशा सूचनाही अजित पवारांनी यावेळी दिल्या. संगमेश्वर येथील स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकासंदर्भातही या बैठकीत आढावा घेण्यात आला आणि आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.

यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, मत्स्य व्यवसाय व बंदरविकास मंत्री नितेश राणे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव आबासाहेब नागरगोजे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, सांस्कृतिक कार्य विभागाच्या सहसचिव नंदा राऊत, पुरातत्व विभागाचे संचालक तेजस गर्गे हे मंत्रालयातून तर पुण्याचे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, कोकणचे विभागीय आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी, साताऱ्याचे जिल्हाधिकारी संतोष पाटील, सिंधुदुर्गच्या जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे दूरदृश्य संवाद प्रणाली वरुन उपस्थीत होते.

# एसटी कामगारांच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक



**मुंबई** : एस टी महामंडळ कामगारांच्या विविध मागण्या आहेत. त्या रास्त असून या मागण्या पूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करून सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटी कामगार संघटना सोबत मंत्रालयात आयोजित बैठकीत सांगितले.

बैठकीस एस. टी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, सहसचिव राजेंद्र होळकर, विविध संघटनांचे संदीप शिंदे, समीर मोरे, श्रीरंग बरगे, हनुमंत ताटे, प्रकाश निंबाळकर, मुकेश तिगोटे, प्रदीप धुरंधर यांच्यासह एस टी कामगार संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले, कामगारांचे महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व अन्य थकीत भत्ते, तसेच दिवाळी सण अग्रिम देण्याबाबत शासन सकारात्मक निर्णय घेईल. सन २०१८ पासून कर्मचाऱ्यांची उपरोक्त स्वरुपाची आर्थिक देणी प्रलंबित आहेत. त्यासाठी सुमारे ४४०० कोटी रुपये लागणार आहेत.

मंत्री सरनाईक म्हणाले की, प्रत्येक वेळेस शासनाकडे निधी मागणी योग्य नाही, त्याकरता एसटीला आर्थिकदृष्ट्या समृद्ध करणे गरजेचे आहे. म्हणून मी कार्यभार स्वीकारल्या पासून एस टी महामंडळाचे उत्पन्न वाढण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. जाहिरातीच्या माध्यमातून वर्षाला सुमारे १०० कोटी रुपये, आधुनिक पार्सल सेवेच्या माध्यमातून वर्षाला १०० कोटी तसेच महामंडळाच्या बस आगारांत असलेले पेट्रोल पंप सध्या केवळ महामंडळाच्या बसेस करीता इंधन पुरवठा करतात. भविष्यात हे पेट्रोल पंप व्यावसायिक स्वरूपात सुरू करण्यात येत आहे. याद्वारे वर्षाला २०० ते २५० कोटी रुपये मिळतील. अशा प्रकारे वर्षाला ५००-६०० कोटी रुपयांची उत्पन्नात वाढ अपेक्षित आहे. या बरोबरच उत्पन्नाचा नवा स्त्रोत म्हणून एसटी महामंडळाचे स्वतःचे प्रवासी अॅप विकसित करण्यात येत आहे, या मधूनही अॅप आधारित टॅक्सी, रिक्षा व ई-बाईक सेवा पुरविण्यात येणार आहे.

पीपीपी (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) तत्त्वावर एस टी महामंडळाच्या जागांचा विकास करण्यात येणार आहे. यामध्ये कामगारांना सदनिका व विश्रामगृह बांधण्याचे देखील प्रायोजन आहे. त्यातून कर्मचाऱ्यांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. सार्वजनिक -खाजगी भागिदारीतुन होणाऱ्या प्रकल्प विकासातून महामंडळाची स्थावर मालमत्ता विकसित होईलच त्याचबरोबर वर्षाला एक ते दीड हजार कोटी रुपये उत्पन्न देखील मिळणे अपेक्षित आहे.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०८ ऑक्टोबर २०२५

## कोजागिरी पौर्णिमेच्या चंद्रदर्शनात रसिकांनी घेतला कविता व गीतांचा आनंद...



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील बसव सहकार भवनमध्ये कोजागिरी पौर्णिमेचे औचित्य साधून श्री महात्मा बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्था, महात्मा बसवेश्वर सार्वजनिक ग्रंथालय व रोटरी क्लब मुरूम सिटी यांच्या सयुक्त विद्यमाने सोमवारी (ता. ६) रोजी कोजागिरी काव्य मैफिलचे आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पतसंस्थेचे चेअरमन शिवशरण वरनाळे होते. यावेळी रोटरीचे अध्यक्ष प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, सचिव कलाप्पा पाटील, माजी पोलीस उपनिरीक्षक राम कांबळे, माजी प्राचार्य दत्तात्रय इंगळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. गुंडेराव गुरव यांनी स्वागत गीतातून पाहुण्यांचे स्वागत केले. विविध घटना, प्रसंग, वास्तव जीवनावर आधारित यावेळी कविवर्य सहशिक्षक रुपचंद ख्याडे यांनी प्रीतीचं चांदणं...तुझे सोबत असणे, माझ्यासाठी आहे पुरे, दूर नको जाऊ कधी, मन

तुझ्याचसाठी झुरे, सहशिक्षक नागनाथ बदोले यांनी आठवणीतली बाटली..., शिवशरण वरनाळे यांनी दगडाचा देव मानवा तू शोधलास दगडात देव...,कलाप्पा पाटील यांनी आपण सारे पाहू लागलो धो धो पाऊस पडताना कोणीन शेतकऱ्या त्या बांधावरती रडताना...,रक्ताळा !.. रात्रच जणू झाली मृत्यूचा नाच, भिजलेल्या थडग्यात पेटला काच, पावसाचा प्रत्येक थेंब हा पावसाळा, जीव देतो की घेतो ? हा तर रक्ताळा... ही कविता सुनील राठोड यांनी गायली. पत्रकार अजिंक्य मुरुमकर यांनी मृत्यू कधीच जिंकत नाही, मृत्यू सत्य बदलू शकत नाही....डॉ. नितीन डागा यांनी रिमझिम गिरे सावन सुलग सुलग जाये मन...अमोल कटके यांनी जगून घ्यावी प्रत्येक भूमिका आयुष्याच्या रंगमंचावर, एकदा की पडदा पडला की पुन्हा प्रवेश नाही... प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले यांनी हिरकणी...गोपनारी हिरकणी गडा गेली, दूध घालाया परत झणी निघाली, पायथ्याशी ते वसे तीचे गाव, घरी जाया मन घेई पार धाव... बाळासाहेब गिरीबा यांनी माणुसकी चा झरा दु:ख आपल्या वाट्याचा आपणच भोगायच असतं..

कांबळे यांनी हिंदीमधून रचना सादर आदींनी कविता सादर करुन श्रोत्यांची मने जिंकली. याप्रसंगी सेवानिवृत्त मुख्याध्यापक काशिनाथ निर्मळे, प्रा. शिवाजी राठोड, प्रा. राजकुमार वाकडे, मल्लिकार्जुन बदोले, संचालक अशोक जाधव, अमृत वरनाळे, मनीष मुदकन्ना, शिवशंकर स्वामी, प्रा.भूषण पाताळे, बालाजी व्हनाजे आदिंची विशेष उपस्थिती होती. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, दत्तात्रय इंगळे, राम कांबळे, प्रा. डॉ. महेश मोटे यांनी मनोगत व्यक्त केले. शिवशरण वरनाळे यांनी अध्यक्षीय समारोप करताना म्हणाले की, कविवर्यांनी सादर केलेल्या कवितेमागे विशिष्ट भावना, अनुभव व विचार असतो. कवितेतील शब्द, प्रतीकं आणि रूपकं यांचा वापर करून कवी त्या भावनांना व्यक्त करत त्यांनी गंधाळलेले शब्द...

रंग रूप गंधात शब्द न्हाऊन निघती, शब्द अवतरती शब्दांची बरसात होती माझी कविता... शाखाधिकारी दत्तात्रय कांबळे, चिदानंद स्वामी, प्रशांत काशेट्टी, सचिन कंटेकूरे, राजू मुदकण्णा, महांतय्या स्वामी, संतोष मुदकण्णा आदींनी पुढाकार घेतला. या काव्य मैफिलचे प्रास्ताविक संतोष कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन सहशिक्षक बालाजी भोसले तर आभार कलाप्पा पाटील यांनी मानले.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

## तिफण सखी मंचच्या श्रीराधे भजनी मंडळास उत्तेजनार्थ पारितोषिक



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** येथील मयुरपार्क परिसरातील हरसिद्धी माता नवरात्र उत्सव ग्रुपतर्फे भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या भजन स्पर्धेच्या माध्यमातून महिलांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, त्यांच्या कला गुणांना वाव मिळावा यासाठी या भजन स्पर्धेचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब औताडे यांच्या तर्फे करण्यात आले होते. या स्पर्धेत 50 पेक्षा अधिक भजनी मंडळाने सहभाग नोंदवला होता.

त्यातून येथील तिफण सखी मंच पुरस्कृत श्री राधे भजनी मंडळास उत्तेजनार्थ पारितोषिक देवून सन्मानित करण्यात आले आहे. या भजन स्पर्धेत मंडळाचे प्रमुख मीना ताठे, अश्विनी सुरडकर, वृषाली सोनवणे, दीक्षा घुगे, योगेश्वरी मुंढे, मनाली घुगे, अनुसया मुगले, वैशाली कापडे, रुद्र ताठे यांनी सहभाग घेतला. या यशाबद्दल तिफण सखी मंचचे मार्गदर्शक डॉ. शिवाजी हुसे, रेवणनाथ ताठे, कैलास मुगले, भीमराव सोनवणे, सोमनाथ ताठे, विलास कापडे, अनिल ताठे, ऊर्मिला हुसे, अनिता ताठे, यांच्यासह तिफण सखी मंचतर्फे अभिनंदन करण्यात आले.




## अभिजात मराठी भाषा सप्ताह निमित्ताने बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात मराठी विभागाद्वारे विविध प्रकारचे उपक्रम



**जालना:** अभिजात मराठी भाषा सप्ताह निमित्ताने बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात मराठी विभागाद्वारे विविध प्रकारचे उपक्रम हाती घेतले आहेत. आजच्या उपक्रमात प्रा. राज्यक्रांती वलसे यांनी मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याच्या संदर्भात माहिती दिली.

अभिजात दर्जा म्हणजे काय? व त्या अनुषंगाने मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सामूहिक जबाबदारी या अनुषंगाने विचार व्यक्त केले. अभिजात दर्जा टिकवून ठेवण्यासाठी आपली भूमिका महत्त्वाची आहे. मराठी भाषेत अधिकाधिक वाचन, मनन आणि चिंतन करून ज्ञान निर्मिती करणे ही आपली जबाबदारी आहे.

मात्र आपण याकडे दुर्लक्ष करत आहोत. आपल्या जगण्याची भाषा मराठी झाली पाहिजे. असे ते म्हणाले. यावेळी मराठी भाषा विभाग प्रमुख डॉ. उद्धव थोरवे, डॉ. प्रियदर्शन भवरे, प्रा. अभिजीत भुतेकर यांच्यासह विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार डॉ. व्यंकटेश कोरेबोइनवाड यांनी मानले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०८ ऑक्टोबर २०२५


## कर्जबाजारी शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या



**दौलताबाद (जावेद अहेमद)** : कर्जबाजारी शेतकरी ची गळफास घेऊन आत्महत्या अरुण अशोक मंजुळ वय 33 वर्ष हे आपल्या कटूब आई, पत्नी, दोन् मुले, एक भाऊ सोबत राहतात त्यांनी रात्रीचे जेवण करून सर्व जण झोपी गेले.

यानंतर अशोक याने दि 07 मंगळवारी सकाळी तीन वाजता गळफास लावून घेतले घेतल्याचे उघळकीस आले जांभाळा तालुका गंगापूर येथील शेतकरी अरुण अशोक मंजुळ वय 33 वर्ष याने आपल्या राहत्या घरी दि 07 मंगळवारी सकाळी तीन वाजता घराच्या पत्र्याच्या लोखंडी इंगल ला साडीच्या काठाच्या पदराने गळफास लावून घेतले व लटकलेल्या अवस्थेत साडीचा पदर तुटून ते खाली पडले होते.

खाली पडल्याचे आवाज ऐकूण त्यांची आई उठून आली अशोक ला त्याचा अवस्थेत नातेवाईक यांनी रात्री चार वाजता घाटी रुग्णालय येथे उपचारासाठी दाखल केले वैध्यकीय अधिकारी यांनी त्याला तपासून मयत घोषित केले अशोक मंजुळ यांची खडकनारळा तालुका गंगापूर वसुसायगाव शिवारात आई च्या नावाने गट न 121 व 131 मध्ये पाच एकर शेती आहे त्यात त्यांनी कापूस व तूर लावलेली होती.

पण यंदा पाऊस जास्त झाले असल्यामुळे शेतामध्ये पाणी शिरल्याने मोठे नुकसान झाले आहे त्याने कर्ज काढून उसणवारी करून शेतात पैसे अडकवले होते याच कारणामुळे त्याने एवढे मोठे पाऊल उचलले असल्याचे त्याचे कुटुंबियांचे प्राथमिक अंदाज आहे या घटनेची नोंद दौलताबाद पोलीस स्टेशन मध्ये करण्यात आले असून पुढील तपास पोलीस अंमलदार प्रकाश धात्रक हे करत आहे


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## सयोग फाउंडेशन तर्फे दिनेश राठोड यांना राज्यस्तरीय आदर्श युवा पुरस्कार प्रदान




**कन्नड (अरुण थोरात)**: सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक व कलाक्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे कन्नड तालुक्याचे भूमिपुत्र दिनेश राठोड यांना कर्तृत्व गौरव पुरस्कार- २०२५ अंतर्गत "आदर्श युवा पुरस्कार" देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

हा पुरस्कार सयोग फाऊंडेशन, पुणे यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय कार्यक्रमात सयोग फाऊंडेशनच्या प्रमुख सपना काकडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

युवा साहित्यिक दिनेश राठोड हे समाजकारण, शिक्षण आणि कला या क्षेत्रांचा सुंदर संगम असलेले व्यक्तिमत्त्व आहे. गेल्या काही वर्षांत त्यांनी युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी, तसेच समाजप्रबोधनासाठी विविध उपक्रम राबवले आहेत.

विशेषतः कोविड काळात त्यांनी राज्यभरातील युवकांची साखळी तयार करून रुग्णांना प्लाझ्मा, बेड, औषधे आणि वैद्यकीय सल्ला उपलब्ध करून दिला. दिवाळीमध्ये "मायेची ऊब" या उपक्रमाद्वारे गरजूंसाठी अन्न, वस्त्र व आरोग्य मदत पोहोचवण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. साहित्य आणि कलाक्षेत्रातही दिनेश राठोड यांचे कार्य उल्लेखनीय आहे.

ते जिजाईसुत या टोपणनावाने लेखन करत असून त्यांनी अनेक मराठी दैनिके, मासिके व दिवाळी अंकांमध्ये त्यांचे लेख, कविता आणि कथा प्रकाशित झाल्या आहेत. ते मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि युवकांमध्ये साहित्यविषयक आवड निर्माण करण्यासाठी लिहित्या नवहातांकरिता तरुणाई या ई- दिवाळी अंकाच्या माध्यमातून व्यासपीठ मिळवून देण्याचे काम करत आहे.

यापूर्वीही दिनेश राठोड यांना विविध सामाजिक व शैक्षणिक संस्थेमार्फत साहित्य भूषण पुरस्कार, काव्यपुष्प समाजभूषण पुरस्कार व साहित्य सन्मान पुरस्कार यांसारख्या अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे. सामाजिक भान जपून, लेखणीच्या जोरावर, शब्दांच्या पावसात वेदना व वास्तव मांडणाऱ्या दिनेश राठोड यांना आदर्श युवा पुरस्कार-२०२५ मिळाल्याने विविध क्षेत्रातून सर्वत्र कौतुक होत आहे.

## अतिवृष्टीमुळे पिकाचे अतोनात नुकसान झाल्याने शेतकऱ्याने जीवन यात्रा संपवली



**दौलताबाद (जावेद अहेमद)** : अतिवृष्टीमुळे पिकाचे अतोनात नुकसान झाल्याने शेतकऱ्याने जीवन यात्रा संपवली गेल्या महिन्यात झालेल्या अतिवृष्टी मुळे हात, तोंडाशी आलेले पिकाचे अतोनात झालेल्या आर्थिक अडचणींना कंटाळून माळीवाडा येथील शेतकरी जगन्नाथ रखमाजी आढाव वय 60 वर्षे यांनी विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली (दि. 7) गुरुवारी सकाळी उघडकीस आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दि 7 मंगळवारी सकाळी सात वाजेच्या सुमारास ग्रामस्थांना शिवनाथ धनायत यांच्या माळीवाडा शिवारातील गट क्रमांक 55 मधील विहिरीत एक मृतदेह तरंगताना दिसून आला.

माळीवाडा पोलिस पाटील प्रमोद साठे यांनी दौलताबाद पोलिसांना माहिती दिली माहिती मिळताच घटनास्थळी पोलीस अंमलदार राजेंद्र भोसले, योगेश सूर्यवंशी,फकिरा तडवी,साहेबराव राठोड,साईनाथ सोनवणे यांनी घटनास्थळी पोहोचून जगन्नाथ यांना पोलिसांच्या टू मोबाईल मध्ये टाकून छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय घाटी रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मृत्यू घोषित केले.

मयत जगन्नाथ आढाव यांची माळीवाडा शिवारात गट क्रमांक 67 मध्ये एक एक्कर 37 गुंठे शेती होती.गेल्या महिन्यात झालेल्या अतिवृष्टी मुळे पिकाचे अतोनात नुकसान झाले शेतीतील खर्च, कर्जबाजारीपणा आणि उत्पादनातील सततची तोटा यामुळे ते मानसिक तणावाखाली होते.

या तणावातून त्यांनी आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलले असावे असा कुटुंबियांचा प्राथमिक अंदाज आहे.मयत जगन्नाथ आढाव यांच्या पश्चात पत्नी, तिन विवाहित मुली,जवाई,नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने माळीवाडा गावात शोककळा पसरली असून परिसरात हळहळ व्यक्त केले जात आहे.


Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी

B.A.(मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क | एम.फिल-पी.एच.डी. थेसिस | मराठी, हिंदी, इंग्रजी | कलर प्रिंट स्कॅनिंग | झेरॉक्स | स्पायरल बायंडिंग | लॅमिनेशन | थेसिस बायंडिंग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०८ ऑक्टोबर २०२५

## खारुताई

खारूताई खारुताई
कुठे चाललीस घाई घाई
कामाशिवाय तुला
सुचत नाही का काही?

पाठीवर तुझ्या
किती गं पट्टेच पट्टे
एका जागी राहात नाही
म्हणून दिले का आईने रट्टे

चाहूल कुणाची लागता
लांब जाते पळून
पुन्हा पुन्हा पाहातेस
मागे मान वळून

दोन पायावर उभी राहून
दाखवितेस भारी तोरा
शोभून दिसतो तुला
रंग भूरा-भूरा

पळतांना हलवितेस
शेपूट झुपकेदार
पाहून तुझा भित्रेपणा
हसू येते फार

खारूताई - खारुताई
कर ना माझ्याशी दोस्ती
आपण दोघं मिळून
खूप करू मस्ती

**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**

## हिरवा गौताळा

हिरव्यागार गौताळ्याच्या
भिजल्या साऱ्या वाटा
दर्या खोऱ्यातून झरे
काढित होत्या वाटा
झुळझुळ मंजुळ वारे
आनंदाने लावीत होते नारे
रानावनामधी राना फुलासंगी
शब्द मैफल जमली होती
हिरव्यागार गौताळ्यासंगी
सृष्टी हिरवी नटली होती
इंद्रधनुष्याचे रंग
फुलात रंगले होते
कवितेला सूर लावीत
पक्षी गात होते
निळे निळे आभाळ ही
श्रोता झाला होता
वन्स मोर म्हणत
वारा कानात सांगत होता
कवितेचा शब्द न् शब्द
धबधबा स्वरबद्ध करत होता
चरणारी गायी वासरे
गळ्यावर गात होत्या
कवीच्या शब्द शब्दांनी
गौताळा फुलला होता
गौताळ्याच्या पानापानात
लेखणी भिजली होती
झरे झिरपीत काढित होत्या
खडकातून वाटा
हिरव्यागार गौताळ्याच्या
भिजल्या साऱ्या वाटा...

**लक्ष्मण वाल्डे-कन्नड**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.नं :-८८८८६०६०६८**

## महिला महाविद्यालयात विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन व व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर:- डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार विभाग, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगर अनुदान प्राप्तविद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन व व्यक्तिमत्त्व विकास या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळा दिनांक ०३ ऑक्टोबर व ०४ ऑक्टोबर २०२५ रोजी संपन्न झाली.दिनांक ०३ ऑक्टोबर २०२३ रोजी देवगिरी महाविद्यालयाच्या मराठी विभाग प्रमुख डॉ. समिता जाधव, महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी व उद्योजिका सौ.स्वाती स्मार्त तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन सोहळा संपन्न झाला.

या प्रसंगी डाॅ.समिता जाधव यांनी "लेखन, वाचन व संभाषणातून व्यक्तिमत्त्व विकास" या विषयावर मार्गदर्शन करताना आपल्या मनातील भावना, इच्छा, विचार योग्य शब्दात दुसऱ्यां पर्यंत पोहचवण्यासाठी संभाषण आणि लेखन ही दोन कौशल्ये आत्मसात करणे किती गरजेची असते ते सोदाहरण पटवून सांगितले.व्यक्त होण्यासाठी आणि भाषिक विकास साधण्यासाठी वाचन, लेखन व संभाषण या कौशल्यांचे महत्व त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून प्रतिपादन केले.यशस्वी उद्योजकाची मुलाखत या दुसऱ्या सत्रात महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी , उद्योजिका व पर्यावरण व सामाजिक प्रकल्प समन्वयक सौ.स्वाती स्मार्त यांनी आपला व्यावसायिक जीवनप्रवास आपल्या मुलाखतीतून उलगडून सांगितला.

त्यांनी विद्यार्थिनींना छोट्या छोट्या व्यवसायाची सुरुवात कशी करावी, फॅशन आणि खाद्य पदार्थ ही दोन क्षेत्रे व्यवसायासाठी संधी देणारी क्षेत्रे कशी आहेत ,त्या संबंधी विद्यार्थ्यांना माहिती देऊन त्यांना व्यवसायाभिमुख होण्याची आवश्यकता समजावून सांगितली.अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनीता बाजपाई यांनी सांगितले की, आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे उपक्रम विद्यार्थिनींना स्वयंरोजगारासाठी प्रेरीत करणारे , आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित करणारे असतात, या उपक्रमात सहभागी होऊन जास्तीत जास्त विद्यार्थिनींनी याचा लाभ करून घ्यावा ,असे आवाहन त्यांनी या वेळी केले.कार्यशाळेच्या आयोजना मागील हेतू आपल्या प्रास्ताविकातून कार्यक्रमाधिकारी डॉ मीनाक्षी देव-निमकर यांनी सांगितला, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनीता बाजपाई यांच्या हस्ते प्रमुख अतिथींचा सत्कार करण्यात आला .

या प्रसंगी सरस्वती प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले,कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा अश्विनी शहाणे यांनी केले.तर आभार प्रकटन डॉ. मीनाक्षी देव- निमकर यांनी केले. या प्रसंगी अभिजात मराठी भाषा दिनानिमित्त आयोजित निबंध लेखन स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली.दिनांक ०४ ऑक्टोबर २०२५ रोजी ही कार्यशाळा दोन सत्रांमध्ये घेण्यात आली. कार्यक्रमाच्या तिसऱ्या सत्रात राजर्षी शाहू महाविद्यालय,वाळूज येथील मानसशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्राजक्ती भोसले यांचे व्यक्तिमत्व विकास या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. तर चौथ्या सत्रात धर्मादाय निरीक्षक श्री जयसिंग मुसाळे व श्री आकाश वानखेडे यांचे स्पर्धा परीक्षा या विषयावर मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते.

व्यक्तिमत्व विकास या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. प्राजक्ती भोसले यांनी विद्यार्थिनींना स्वत:मध्ये आत्मविश्वास निर्माण करणे व बहुआयामी व्यक्तिमत्व घडविण्यासाठी शारीरिक,मानसिक,भावनिक, सामाजिक आणि आध्यात्मिक दृष्ट्या सक्षम असणे किती महत्त्वाचे आहे हे विविध उदाहरणातून पटवून सांगितले , व्यक्तिमत्त्व विकासात आत्मविश्वास, इच्छाशक्ती, सकारात्मकता,क्रियाशीलता आणि महत्वाकांक्षा हे आईस्क्रीम किती महत्त्वाचे असते ते सोदाहरण पटवून सांगितले.

श्री जयसिंग मुसाळे यांनी स्पर्धा परीक्षे ची पूर्व तयारी या विषयी माहिती सांगून विविध स्पर्धा परीक्षा, त्यासाठी आवश्यक पात्रता या विषयी सखोल आणि उद्बोधक माहिती विद्यार्थिनींना दिली.कार्यशाळेचा समारोप डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे संचालक डॉ.सुधाकर शेंडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. डाॅ.सुधाकर शेंडगे यांनी आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देऊन आजीवन या शब्दाचा अर्थ व त्या दृष्टीने शिक्षणाचा अपेक्षित असलेला अनुबंध त्यांनी वेगवेगळ्या उदाहरणातून उलगडून सांगितला.कार्यशाळेचे आभार प्रकटन कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. मीनाक्षी देव -निमकर यांनी केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ रमा दुधमांडे यांनी केले तर श्री.जयसिंग मुसाळे यांचा परिचय डॉ अजय पवार यांनी तर डॉ. सुधाकर शेंडगे यांचा परिचय प्रा.पूजा मुठ्ठे-कवडे यांनी करून दिला, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई यांच्या हस्ते प्रमुख अतिथींचा सत्कार करण्यात आला कार्यशाळेस महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थीनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती राष्ट्रगीताने कार्यशाळेचा समारोप झाला.

**१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)**
**विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी**

**D.M.L.T**
**Diploma In Medical Laboratory Technology**

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
**मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.**
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय मुकुंदवाडी छत्रपती संभाजीनगर शाळेतील इयत्ता सहावी ते आठवी वर्गातील विद्यार्थ्यांनी स्व:त लिहिलेल्या कवितेच्या प्रकाशन. मार्गदर्शक श्रीमती अर्चना पंडित मराठी विषय शिक्षिका व प्रेरणास्थान केंद्रीय मुख्याध्यापक श्री चौधरी के बी